इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद

**मुंबई उच्च न्यायालय**
**दिवाणी अपिलीय अधिकारीता**

**रिट याचिका क्रमांक १२७९९/२०२३**

सचिन देवराम साबळे,
वय ३८ वर्षे, धंदा - नोकरी
रा. निमगिरी, ता. जुन्नर,
जिल्हा – पुणे, ४१०५२० ... याचिकाकर्ता

<u>विरुद्ध</u>

1. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन
महामंडळ, एमएसआरटीसी
मध्यवर्ती कार्यालय,
डॉक्टर आनंदराव नायर मार्ग,
मुंबई सेंट्रल, मुंबई

2. महाराष्ट्र राज्य
परिवहन मंत्रालयाच्या सचिवांमार्फत
(महाराष्ट्र), मंत्रालय, मुंबई -३२ ... उत्तरवादी

...

याचिकाकर्त्याच्या वतीने वकील सुवर्णा यादव.
वकील श्री. नितेश भुतेकर सोबत प्रथमेश मंडलिक यांनी उत्तरवादी क्रमांक १ यांची बाजू मांडली.
राज्यासाठी अतिरिक्त सरकारी वकील श्री. ओ. ए. चांदूरकर सोबत ए.व्ही.नाईक यांनी बाजू मांडली.

...

**न्यायमंच : न्यायमूर्ती रवींद्र वि. घुगे**
**आणि**
**न्यायमूर्ती अश्विन डी. भोबे.**

**राखीव दिनांक : ५ डिसेंबर २०२४**
**घोषित दिनांक : १९ डिसेंबर २०२४**

**न्यायनिर्णय (न्यायमूर्ती अश्विन द. भोबे यांचे द्वारे) :-**

1. न्यादेश, न्यादेशावर त्वरित उत्तर मागवण्यात आले आणि पक्षकारांच्या संमतीने अंतिम सुनावणी घेण्यात आली.

2. याचिकाकर्त्यास विभागीय नियंत्रक पदासाठी अपात्र ठरवले आहे कारण त्याच्याकडे १००० पेक्षा जास्त कर्मचारी काम करत असलेल्या व्यावसायिक संस्थेमध्ये काम करण्याचा दहा वर्षाचा अनुभव नाही(विवादित निर्णय). उत्तरवादी क्रमांक १ (एमएसआरटीसी) यांनी या विवादित निर्णयाद्वारे संपूर्ण निवड प्रक्रिया रद्द केली आहे.

3. प्रस्तुत याचिकेद्वारे, याचिकाकर्त्याने खालील प्रमाणे विनंती केली आहे :-

> "(ए) ही रिट याचिका कृपया मंजूर केली जावी.
>
> (बी) रिट ऑफ मेंडामस जारी करून किंवा इतर कोणतीही योग्य रिट जारी करून, उत्तरवादी क्रमांक १ यांनी दिनांक १५/०७/२०१९ रोजी दिलेला विवादित निर्णय रद्द करण्यात बाबत आदेश जारी करण्यात यावा.

(सी) रिट ऑफ मेंडामस जारी करून किंवा इतर कोणतीही योग्य रिट जारी करून किंवा आदेश किंवा सूचना जारी करून उत्तरवादी क्रमांक १ यांना आदेश द्यावा की याचिकाकर्त्याने केलेल्या विनंतीचा विचार करावा आणि विभागीय नियंत्रक पदासाठी नियुक्तीपत्र जारी करावे.

**तथ्यात्मक स्थिती :**

4. जाहिरात क्रमांक १/२०२८ अन्वये उत्तरवादी क्र.१ यांनी विभागीय नियंत्रक पदासाठी अर्ज मागविले होते. विभागीय नियंत्रक पदावर नियुक्तीसाठी पात्र होण्यासाठी जाहिरात क्रमांक १/२०१८ मध्ये विहित केलेल्या सर्व आवश्यक अटींची पूर्तता तो करतो, असा युक्तिवाद याचिकाकर्त्याने केला आहे. याचिकाकर्त्याने आपल्या अर्जासह ईसीआयएल रॅपिस्कॅन ने जारी केलेले अनुभव प्रमाणपत्र सादर केले, ज्यात याचिकाकर्त्याकडे आवश्यक दहा वर्षाचा अनुभव आहे असे प्रमाणित करण्यात आले आहे. याचिकाकर्त्याचा असा युक्तिवाद आहे की ईसीआयएल आणि रॅपिस्कन लिमिटेड यांच्यामध्ये जॉईंट वेंचर आहे, व त्यांचे कार्यालये हैदराबाद, मुंबई, बेंगळुरू, चेन्नई, कोलकाता, पुणे आणि अहमदाबाद येथे आहेत. ज्यामध्ये १००० पेक्षा जास्त कर्मचारी आहेत. यावर उत्तरवादी क्रमांक १ यांनी असे सांगितले की पुणे येथील ईसीआयएल रॅपिस्कॅनच्या कार्यालयात विहित संख्येपेक्षा कमी कर्मचारी संख्या आहे, त्यामुळे याचिकाकर्ते या पदासाठी अपात्र आहेत. त्यामुळे विवादित निर्णयाद्वारे निवड प्रक्रिया रद्द केली गेली. त्यामुळे ही याचिका आहे.

5. उत्तरवादी क्रमांक १ यांनी एमएसआरटीसी चे महाव्यवस्थापक (पी अँड आयआर) श्री तुलसीदास भरसाट यांच्या दिनांक ०१/०८/२०२४ रोजीच्या आपले उत्तर प्रतिज्ञापत्राद्वारे याचिकेला विरोध केला. उत्तरवादी क्रमांक १ यांनी असा युक्तिवाद केला की याचिकाकर्त्याने अनुभवासंदर्भात सादर केलेली कागदपत्रे ही, ईसीआयएल रॅपिस्कन लिमिटेड नावाच्या एका कंपनीची आहेत आणि त्यांच्या गोपनीय अहवालानुसार, या कंपनीचे एक कार्यालय पुणे येथे आहे, ज्यामध्ये कामगार/कर्मचाऱ्यांची संख्या १००० पेक्षा कमी आहे. त्यामुळे उत्तरवादी क्रमांक १ ने ही याचिका फेटाळण्याची विनंती केली.

6. आम्ही दोन्ही पक्षांच्या वकिलांचे युक्तिवाद ऐकले आहेत आणि त्यावर विचार केला आहे. या याचिकेमध्ये ज्या मुख्य मुद्द्यावर निर्णय घेण्याचा आहे तो म्हणजे, जाहिरात क्रमांक १/२०१८ मध्ये नमूद केलेल्या पात्रतेस म्हणजेच १००० पेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या व्यावसायिक संस्थेमध्ये १० वर्षापर्यंत कामाचा अनुभव असावा यास याचिकाकर्ता पात्र होत नसल्यामुळे तो विभागीय नियंत्रकाच्या पदासाठी अपात्र आहे असे उत्तरवादी क्रमांक १ यांनी घोषित केले आहे ते योग्य आहे का?

**विश्लेषण:-**

7. जाहिरात क्र.१/२०१८ अन्वये उत्तरवादी क्र.१ यांच्याद्वारे विभागीय नियंत्रक पदासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. जाहिरात क्र.१/२०१८ मधील या याचिकेशी संबंधित असलेल्या अटी खालीलप्रमाणे आहेत:-

(ए) कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेतून प्रथम श्रेणी पदवी, किंवा मान्यताप्राप्त संस्थेतून द्वितीय श्रेणी पदवी सोबत मान्यताप्राप्त संस्थेतून पदव्युत्तर पदवी किंवा व्यवसाय व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्थापन, कामगार / कर्मचारी व्यवस्थापन यामध्ये मान्यता प्राप्त संस्थेकडून पदविका.
(बी) अनुभव : रेल्वे /रस्ते /जलवाहतूक क्षेत्रातील व्यवस्थापना मध्ये १० वर्षांचा अनुभव. किंवा
१००० पेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या व्यावसायिक संस्थेत १० वर्षांचा अनुभव. किंवा
भारतीय सैन्याच्या कॅप्टन दर्जाच्या पदाचा किंवा भारतीय हवाई दल / नौदलात समकक्ष पदाचा किमान ३ वर्षांचा अनुभव.

8. याचिकाकर्ता हा जाहिरात क्रमांक १/२०१८ च्या अट क्रमांक (ए) ची पूर्तता करण्यास पात्र ठरतो आणि याचिकाकर्त्यास १० वर्षांच्या कालावधीचा अनुभव आहे यात कोणताही वाद नाही. सध्याच्या याचिकेतील वाद हा जाहिरात क्र.१/२०१८ च्या अट क्रमांक (ब) च्या संदर्भात आहे. हा वाद विशेषतः व्यावसायिक संस्था आणि त्या संस्थेतील कर्मचाऱ्यांची संख्या या मुद्द्यावर आधारित आहे, सध्याच्या प्रकरणात कर्मचाऱ्यांची संख्या १००० पेक्षा जास्त असणे अपेक्षित आहे. याचिकाकर्त्याचा दावा आहे की ईसीआयएल रॅपिस्कन लिमिटेड ही एक व्यावसायिक संस्था आहे ज्यात १०००

पेक्षा जास्त कर्मचारी आहेत. याउलट उत्तरवादी क्रमांक १ चा दावा आहे की संबंधित व्यावसायिक संस्था १००० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची आवश्यकता पूर्ण करत नाही.

9. रिट याचिका क्रमांक ११८४/२०२१ मध्ये देखील जाहिरात क्रमांक १/२०१८ हा विषय होता, ही याचिका सुहास सुदामराव चौरे विरुद्ध व्यवस्थापकीय संचालक, एमएसआरटीसी आणि इतर यांनी दाखल केली होती. या याचिकेत याचिकाकर्त्याला विभागीय नियंत्रक पदासाठी अपात्र ठरविण्यात आले होते, कारण याचिकाकर्त्याने १० वर्षांचा कामाचा अनुभव त्या बेसिक पात्रतेच्या अटींच्या आधी प्राप्त केला होता, ज्यामध्ये त्या याचिकेतील याचिकाकर्त्याकडे व्यवसाय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी किंवा पदविका असणे आवश्यक होते. त्या याचिकेतही जाहिरात क्र. १/२०१८ रद्द करण्याची मागणी केली होती. हे न्यायालय माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर अवलंबून राहिले जे प्रकाशित झाले १९९५ एसयूयुपी (३) सुप्रीम कोर्ट केसेस ३३२ (सुभाष श्रीराम धोंडे विरुद्ध महाराष्ट्र सरकार आणि इतर ), तसेच या न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ, या सहपिठाने रिट याचिका क्रमांक ५१२७/२०१९ (सोनाली सहदेव आव्हाड विरुद्ध महाराष्ट्र सरकार आणि इतर) या मधील निर्णय, यावर अवलंबून राहून रिट याचिका क्रमांक ११८४/२०२१ मंजूर केली. सुहास चौरे (सुप्रा) यापूर्तता निकालातील परिच्छेद क्र.१३ ते १७ खालीलप्रमाणे :-

१३. अशा प्रकारे, याचिकाकर्त्यास केवळ या कारणास्तव अयोग्य ठरवण्यात आले आहे कारण त्याने आवश्यक शैक्षणिक पात्रता म्हणजेच व्यवसाय व्यवस्थापनातील पदव्युतर पदवी किंवा पदविका मिळण्यापूर्वी दहा वर्षाचा अनुभव प्राप्त केला होता . एमएसआरटीसी ही त्यांच्या अध्यक्षांनी दिलेल्या सूचनांवर अवलंबून राहिली, ज्यामध्ये असे नमूद करण्यात आले होते की शैक्षणिक पात्रता मिळवल्यानंतरच अनुभवाची गणना केली जाईल.

१४. मुद्दा असा आहे की, निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अध्यक्षांच्या सूचनेनुसार एमएसआरटीसी याचिकाकर्त्यांची पात्रता विचारात घेऊ शकते का विशेषतः तेव्हा जेव्हा जाहिरातीमध्ये बेसिक पात्रता मिळवल्यानंतर दहा वर्षाच्या अनुभवाच्या आवश्यकतेची अट नसताना. नोंद घेण्याची गोष्ट म्हणजे आमच्या समोर असा कोणताही नियम किंवा परिपत्रक सादर केले गेलेले नाही, ज्यामध्ये विभागीय नियंत्रकाच्या पदाच्या नियुक्तीसाठी शैक्षणिक पात्रता मिळवल्यानंतरच अनुभव आवश्यक असावा असे नमूद असेल. यात शंका नाही की, सध्याच्या प्रकरणात, एमएसआरटीसीला सदर जाहिरात रद्द करण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार आहे. पण हा अधिकार कोणत्याही प्रकारे मनमानीपणे वापरला जाऊ शकत नाही. या परिस्थितीत आम्ही याचिकाकर्त्यांच्या विद्वान वकिलांनी सादर केलेल्या न्यायनिर्णयाचा संदर्भ देतो, जो प्रकाशित झाला आहे १९९५ एसयूपीपी (३) सुप्रीम कोर्ट केसेस ३३२ [सुभाष श्रीराम धोंडे विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर] मध्ये, जो आमच्या मते याचिकाकर्त्याच्या बाजूने आहे. आम्ही संपूर्ण निर्णय आता पुनः प्रस्तुत करतो.

"१. मंजुरी दिली संबंधित पक्ष ऐकले.

२. न्यायधिकरणाने अपीलकर्त्याचा अर्ज केवळ या कारणास्तव फेटाळला आहे की, अपीलकर्त्याने शैक्षणिक

पात्रता प्राप्त करण्यापूर्वी एक वर्षाचा कामाचा अनुभव प्राप्त केला होता , जो या प्रकरणात डिप्लोमा इन ऑटोमोबाइल इंजिनीअरिंग आहे. त्यासाठी न्यायाधिकरणाने सरकारने काढलेल्या परिपत्रकाचा आधार घेतला. तथापि, नियम, म्हणजेच मोटर वाहन विभाग (भरती) नियम, १९९१ , जे संविधानाच्या अनुच्छेद ३०९ अंतर्गत बनवण्यात आले आहेत, ते दर्शवतात की, नियम ३ (इ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे किमान एक वर्षाचा अनुभव एका नामांकित ऑटोमोबाईल वर्कशॉप मध्ये असणे पुरेसे आहे. हा नियम अनुभव मिळवण्याच्या कालावधीच्या बाबतीत तो अनुभव शैक्षणिक पात्रतेच्या आधी असावा किंवा नंतर असावा यात काहीही फरक करत नाही. याशिवाय नोंदीवरून असे दिसते की, शैक्षणिक पात्रता मिळवल्यानंतरही याचिकाकर्त्याने प्रसिद्ध ऑटोमोबाईल वर्कशॉप मध्ये एक वर्षाचा अतिरिक्त अनुभव प्राप्त केला आहे जो परिपत्रकात नमूद केलेल्या आवश्यकतेनुसार आहे. न्यायाधीकरणाने परिपत्रकावर अवलंबून राहून निर्णय घेताना चूक केली आहे, हे परिपत्रक संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खाली बनवलेल्या नियमांचे स्थान घेत नाही. त्यामुळे न्यायाधिकरणाचा निर्णय चुकीचा आहे, असे आमचे मत आहे. अपीलकर्ता नियमानुसार आवश्यक पात्रता पूर्ण करीत असल्याने न्यायाधिकरणाचा निर्णय रद्द करावा लागेल. त्यानुसार आम्ही न्यायाधिकरणाचा आक्षेपार्ह निर्णय रद्द करतो आणि उत्तरवादीला निर्देश देतो की अपीलकर्त्याने लेखी परीक्षेत मिळवलेले गुण आणि आधीच घेतलेल्या मुलाखतीसह आवश्यक पात्रतेची पूर्तता केल्यास त्याचा नियुक्तीसाठी विचार करावा. अपील मंजूर करण्यात आले आहे आणि खर्चाच्या बाबतीत कोणतेही आदेश नाहीत.

१५. आम्ही याचिकाकर्त्यांच्या विद्वान वकिलांशी सहमत आहोत, त्यांनी या न्यायालयाच्या सहपीठ असलेल्या औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयाचा संदर्भ दिला जो याचिकाकर्त्यांच्या प्रकरणाला बळकटी देतो, तो निर्णय म्हणजे, फेब्रुवारी २७, २०२० रोजी रिट याचिका क्रमांक ५१२७/२०१९ (सोनाली सहदेव आव्हाड विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर ) मध्ये दिलेला निर्णय. त्यातील संदर्भित परिच्छेद क्रमांक ५ आणि ६ खाली नमूद करण्यात आला आहे.

> "५. जाहिरातीतील शैक्षणिक पात्रता आणि अनुभवाच्या अटी वाचल्यानंतर स्पष्टपणे दिसून येते की अनुभव शैक्षणिक पात्रता मिळवल्यानंतरच प्राप्त करावा लागेल, असे जाहिरातीत कोठेही स्पष्ट करण्यात आलेले नाही. याबाबत जाहिरातीत काही नमूद नाही.
>
> ६. जर जाहिरातीत असे नमूद केले असते की, अनुभव शैक्षणिक पात्रता मिळवल्यानंतरच प्राप्त करावा लागेल तर उत्तरवादी यांचे युक्तिवाद ग्राह्य धरले गेले असते. मात्र, त्याबाबत जाहिरातीत काहीही नमूद नाही. याचिकाकर्त्याला ११.०२.२०१५ ते १६.०६.२०१६ या कालावधीत वाहतूक विभागात आवश्यक अनुभव असल्याचे सिद्ध करण्यासाठी याचिकाकर्त्याने परिवहन कंपनीने दिलेले प्रमाणपत्र पटलावर सादर केले आहे. हे प्रमाणपत्र किती समर्पक आहे हे उत्तरवादीने ठरवावे. याशिवाय, उत्तरवादीला याचिकाकर्त्याचा दावा फक्त या कारणावरून नाकारता येणार नाही की, याचिकाकर्त्याचा अनुभव पात्रते पूर्वीचा आहे, विशेषतः तेव्हा जेव्हा जाहिरातीमध्ये अशी कोणतीही अट नमूद नसताना."

१६) वरील निर्णयांचा आधार घेत आणि संबंधित तथ्ये आणि प्रतिस्पर्धी युक्तिवादांचा गांभीर्याने विचार केल्यानंतर, आमचे असे मत आहे की याचिकाकर्त्याने जाहिरातीत नमूद केलेली

आवश्यक पात्रता पूर्ण केली आहे, त्यानंतर एम एस आर टी सी अध्यक्ष यांच्या सूचनेनुसार अपात्र घोषित केले जाऊ शकत नाही विशेषतः तेव्हा जेव्हा निवड प्रक्रिया मोठ्या प्रमाणात पुढे गेली होती तेव्हा याचिकाकर्त्याला अपात्र ठरवणे अन्याय पूर्ण आणि मनमानी आहे. या जाहिरातीत शैक्षणिक पात्रता प्राप्त केल्यानंतर १० वर्षांचा अनुभव घेण्याची अट घालण्यात आली नव्हती. जरी जाहिरातीत सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याला जाहिरात रद्द करण्याचा अधिकार देण्यात आला असला, तरी एमएसआरटीसी ने याचिकाकर्त्याला अपात्र ठरविण्याचे मूलभूत कारण अन्यायकारक आणि चुकीचे असल्यामुळे, अशा परिस्थितीत अधिकाराचा वापर केला जाऊ शकत नाही. आम्हाला हे नमूद करताना कोणतीही शंका नाही की, एमएसआरटीसीची जाहिरात रद्द करण्याची कारवाई ज्या कारणावरून झाली आहे त्यात अधिकाराचा अविवेकी वापर केला जात असेल, तर याचिकाकर्त्याला या याचिकेत विनंती केलेल्या मदतीपासून वंचित ठेवता कामा नये.

१७. खर्चाचा कोणताही आदेश न देता रिट याचिका मंजूर केली जाते. जर याचिकाकर्त्याने अन्यथा पात्रता पूर्ण केली, तर त्याची नियुक्ती तीन महिन्याच्या आत केली जावी.

10. तुषार मनोहर गांद्रे यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळा विरोधात दाखल केलेली रिट याचिका (रिट पिटीशन क्र. ८७२०/२०२२) मध्ये जाहिरात क्रमांक १/२०१८ वर सुनावणी करताना समांतर सुहास चौरे (सुप्रा) यांच्या निर्णयाचा आधार घेत उत्तरवादी क्रमांक १ यांना तुषार मनोहर गांद्रे या याचिकाकर्त्याची नेमणूक करण्याचे निर्देश दिले.

11. सध्याच्या प्रकरणात, उत्तरवादी क्रमांक १ ने याचिकाकर्त्याला अपात्र ठरवले आहे, कारण याचिकाकर्त्याने १० वर्षांच्या अनुभवाच्या संदर्भात ज्या व्यावसायिक संस्थेवर विश्वास दर्शवला आहे, ती १००० पेक्षा जास्त कर्मचारी काम असलेल्या संस्थेची आवश्यकता पूर्ण करत नाही.

12. जाहिरात क्रमांक १/२०१८ मधील अनुभवाशी संबंधित अटी, असे सूचित करतात की या जाहिरातीमध्ये " १००० पेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या व्यावसायिक संस्थे मध्ये १० वर्षांचा अनुभव" असणे आवश्यक आहे. जाहिरात क्रमांक १/२०१८ मधील अनुभवाच्या अटीचा अभ्यास केल्यावर, जाहिरातीत "व्यावसायिक संस्था" याची परिभाषा किंवा स्पष्टीकरण दिलेले नाही. त्याबाबत जाहिरातीत कोणतेही भाष्य नाही. सदर जाहिरात क्रमांक १/२०१८ मध्ये व्यावसायिक संस्थेच्या एका कार्यालयामध्ये कर्मचाऱ्यांची संख्या किती असावे हे नमूद केलेले नाही. या जाहिरातीत व्यावसायिक संस्थेचे १००० कर्मचारी हे त्यांच्या एका कार्यालयातील किंवा एका शहरातील कार्यालयातील असावे या अटींचा उल्लेख केलेला नाही. जर जाहिरात क्रमांक १/२०१८ मध्ये कर्मचाऱ्यांची संख्या, व्यावसायिक संस्थेच्या एका कार्यालयातील असावी, असे नमूद केले असते तर उत्तरवादी क्रमांक १ चा युक्तिवाद ग्राह्य धरला जाऊ शकला असता. याचिकाकर्त्याने दिलेल्या आणि त्याच्या युक्तिवादासाठी संदर्भित केलेल्या दस्तऐवजांमध्ये ईसीआयएल- रॅपिस्कन लिमिटेड यांचे जॉईंट व्हेंचर आहे, व तिच्याकडे

१००० पेक्षा जास्त कर्मचारी आहेत, हा एक संयुक्त उपक्रम असल्याने १००० हून अधिक कर्मचारी आहेत (याचिकाकर्त्याने दाखल केलेल्या रिजॉइंडर सोबत संलग्न निशाणी आर -१ आणि आर -२ मध्ये ७५०० कर्मचारी नमूद) याचा उत्तरवादी क्रमांक १ ने विरोध केला नाही.

13. याचिकाकर्त्याचा अर्ज फेटाळला गेला कारण, त्याने जाहिरात क्रमांक १/२०१८ मध्ये नमूद केलेल्या अनुभवाच्या अटींची पूर्तता केली नाही, वर नमूद केलेल्या कारणांमुळे हे कारण अन्याय पूर्ण आणि चुकीचे आहे.

14. उत्तरवादी क्रमांक १ हे नाकारत नाही की याचिकाकर्त्याकडे १० वर्षांचा अनुभव आहे. त्यामुळे सुहास चौरे (सुप्रा) आणि तुषार मनोहर गांद्रे (सुप्रा) यांच्या प्रकरणातील निकाल हा याचिकाकर्त्याच्या प्रकरणात योग्य प्रकारे लागू होतो.

15. उत्तरवादी क्रमांक १ चा तीव्र विरोध असूनही, आम्हाला रेकॉर्डवरून असे आढळले आहे की याचिकाकर्ते जाहिरात क्रमांक १/२०१८ मध्ये प्रकाशित केलेल्या निकषांची पूर्तता केल्यामुळे विभागीय नियंत्रक म्हणून नियुक्त होण्यास स्पष्टपणे पात्र होते . उत्तरवादी क्रमांक १ चे विद्वान वकील, रेकॉर्ड / जाहिरात क्रमांक १/२०१८ च्या आधारे, याचिकाकर्ते यांच्यामध्ये कोणत्या निकषांची कमतरता होती हे दर्शविण्यास अक्षम आहेत. सुहास चौरे (सुप्रा) आणि तुषार मनोहर गांद्रे (सुप्रा) यामध्ये दिलेल्या निर्णयानुसार, जेव्हा एकदा उमेदवार जाहिरातीतील पूर्व अटी पूर्ण करतो, तेव्हा नंतर

नियुक्त किंवा संस्थेचा उच्च अधिकारी त्या उमेदवाराला अपात्र किंवा अयोग्य ठरवू शकत नाही.

16. जाहिरात क्रमांक १/२०१८, जी उत्तरवादी क्रमांक १ यांच्याद्वारे रद्द करण्यात आली, त्यामध्ये या न्यायालयाने सुहास चौरे (सुप्रा) आणि तुषार मनोहर गांद्रे (सुप्रा) यांच्या प्रकरणांद्वारे न्यायनिर्णय देऊन हस्तक्षेप केला. उत्तरवादी क्रमांक १ ला निर्देश दिले की, सुहास चौरे व तुषार महोहर गांद्रे यांची विभागीय नियंत्रक पदी तीन महिन्यांच्या आत नियुक्ती करावी.

17. तात्कालिक प्रकरणात, उत्तरवादी क्रमांक १ च्या दप्तरावरून असा निष्कर्ष निघू शकत नाही की विद्यमान याचिकाकर्ते अपात्र होते. त्यामुळे विभागीय नियंत्रक ही पदे रिक्त आहेत, हे लक्षात घेऊन सुहास चौरे (सुप्रा) व तुषार मनोहर गांद्रे (सुप्रा) यांच्यातील कारणांवर आधारित राहून, आम्ही त्याच मार्गदर्शनाचे अनुसरण करणे योग्य ठरवले आहे व सुहास चौरे (सुप्रा) व तुषार मनोहर गांद्रे (सुप्रा) यांना जसा दिलासा दिला आहे, तसाच दिलासा देणे आम्हाला योग्य वाटते.

18. याचिकाकर्त्याला अपात्र ठरविणारा उत्तरवादी क्रमांक १ चा निर्णय तर्कहीन आणि चुकीचा आहे, परिणामी तो रद्द बातल ठरवला जातो. ही रिट याचिका मंजूर केली जात आहे. उत्तरवादी क्रमांक १ ला आजपासून तीन महिन्यांच्या कालावधी च्या आत

याचिकाकर्त्याची विभागीय नियंत्रक म्हणून नियुक्ती करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

19. न्यादेश कायम करण्यात येतो.

(न्यायमूर्ती अश्विन डी. भोबे) (न्यायमूर्ती रवींद्र व्ही. घुगे)

---

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x